Review Of Research
Vol. 4 | Issue. 3 | Dec. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वर्धा जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची कार्य पध्दती व विकास कार्याचे मूल्यमापन : एक अभ्यास

**प्रा. भास्कर जे. वाळके**
लोक महाविद्यालय, जि. वर्धा.

## सारांश

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश वर्धा जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक विकासाचे विश्लेषणात्मक अभ्यासकरणे हा होता.वर्धा जिल्ह्यातील ३०० उत्तरदाऱ्यांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करून यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता काई वर्ग मुल्य या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करून विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या बाजारपेठांचे म्हणजेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्य कोणत्या पद्धतीने सुरु आहे, त्यापासुन शेतकरी वर्गाला लाभ मिळत आहे किंवा नाही, शेतकऱ्याकरिता जिल्हयातील बाजार समित्यांनी कोणकोणत्या सोई केलेल्या आहेत तसेच कोणकोणत्या सोई व सवलतींचा शेतकऱ्यांना लाभ होत आहे. जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्नाची कोणकोणती साधने आहेत. ती साधने त्यांच्या दृष्टीने परिपूर्ण आहेत काय की कृषी उत्पन्न बाजार समितीना इतर ठिकाणाहून कर्ज घ्यावे लागते की सरकारकडून अनुदान प्राप्त होते. त्याचप्रमाणे बाजार समित्या शेतकऱ्यांच्या सोईकरिता कोणकोणत्या बाबींवर खर्च करतात बाजारपेठांमध्ये कोणकोणत्या अनिष्ट प्रथा आहेत? कारण ग्राहक व विक्रेते यांचे हित सुरक्षित ठेवून वस्तूंच्या खरेदी विक्रीचे व्यवहार सुरळीतपणे पार

पाडण्याकरिता बाजरपेठांचे नियंत्रण करण्याची आवश्यकता आता सर्वमान्य झाली आहे. शेतमालाचा विचार केल्यास शेतमालाची विक्री करणारे शेतकरी आणि शेतमालाची खरेदी करणारे व्यापारी किंवा दलाल या दोन पक्षांत खरेदी विक्रीचा व्यवहार समान भूमिकेवरुन होऊ शकत नाही. शेतकरी साधनांच्या दृष्टीने अत्यंत दारिद्री असंघटीत व अज्ञानी असतो तर दुसरा पक्ष म्हणजे व्यापारी साधनांच्या दृष्टीने संपन्न संघटीत व जागरुक असतो. हया कारणांमुळे शेतकऱ्यांचे विविध प्रकारे शोषण होणे अत्यंत नैसर्गिक असते. बाजारपेठांचे नियंत्रण करण्याची शास्त्रीय पद्धती अस्तित्वात असल्यास शेतकऱ्यांना खालील अडणींचा सामना करावा लागतो.

१. शेतकऱ्याने विकलेल्या मालाच्या किंमतीमधून विविध सबबीवर कपात करणे.
२. शेतकऱ्यांचा मुळीच संबंध नाही अशा कारणांसाठी अनुदान वसुल करणे.
३. शेतकऱ्याने अग्रीम म्हणून उचललेल्या राशीवर भरमसाट दराने व्याज आकारणे.
४. शेतकऱ्याने विक्रीसाठी आणलेल्या मालाची विक्री गुप्तरितीने किंवा सांकेतिक पद्धतीने करणे.
५. शेतकऱ्याने मालाची विक्री केल्यानंतर त्याला ताबडतोब शोधन न देणे.
६. शेतकऱ्यांकडून अयोग्य दराने दलाली वसूल करणे.
७. शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या मालातुन मोठया प्रमाणात अडत्या/दलाल/व्यापाऱ्याने नमुना म्हणून मालाची उचल करणे.
८. बाजारपेठेत जाणीवपूर्वक गटबाजी करुन शेतमालाचे भाव खाली आणण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.

वरील सर्व अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निर्मिती याचे उच्चाटन किती प्रमाणात झाले आहे. याबाबत केलेले कार्य कितपत यशस्वी झाले आहे. तसेच बाजारसमितीने योग्य भाव व योग्य वजनमाप इ. बाबतचे कार्य कितपत यशस्वी झाले किंवा त्यात सुधारणा करण्याची गरज आहे काय? त्याचप्रमाणे शेतकऱ्याच्या उत्पादनाला योग्य भाव नसल्यास बाजार समितीच्या आवारामध्ये साठवणूकीच्या सोई आहे काय? व असल्यास त्या नाममात्र भाडयावरच शेतकऱ्यांच्या मालसाठवणूकीसाठी दिल्या जातात काय तसेच बाजारसमितीचे प्रबंधन योग्यरितीने होत आहे किंवा नाही? त्याचप्रमाणे आर्थिक बाबींचा म्हणजेच उत्पन्न व खर्चाच्या योग्यपणे हिशेब ठेवला जातो किंवा नाही व जिल्हयातील बाजार समित्यांनी आर्थिक स्थिती कशा प्रकारची आहे, त्यापासून शेतकऱ्यांना कोणकोणते फायदे प्राप्त होतात त्याचप्रमाणे शेतकऱ्यांकरिता बाजार समितीला मिळणाऱ्या नफ्यातून कोणकोणत्या सोई उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. हया सर्व प्रश्नांची उत्तरे मिळविण्यसाकरिता त्या विषयी विश्लेषण करण्याकरिता कृषी उत्पन्न समित्याच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

**उद्दिष्टे**

१. वर्धाजिल्हयातील बाजार समित्यांचा विकासाचे अध्ययन करणे.
२. कृषी उत्पन्न बाजार समितिच्या विकास व कार्याचे मूल्यमापन करणे.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचा उगम**

प्रबंधन, नियोजन व नियंत्रण या तीनही सूत्रांचा अवलंब केल्याशिवाय कोणतेही कार्य यशस्वी होत नाही. कोणताही विकास योजनाबद्ध व नियंत्रीत असेल तरच तो निकोप असतो. त्यामुळे कृषी उत्पादनालाही हाच न्याय लागू होतो.

आपल्या देशातील मुख्य व्यवसाय शेती शेतमालाच्या उत्पादकाला म्हणजेच शेतकऱ्याला त्याने केलेल्या कष्टांच्या फळास जर योग्य भाव मिळाला नाही, त्याचा माल विकला जातांना तो फसविला गेला, तर त्याच्या व्यवसायात त्याला नुकसान येणार हे उघड आहे. असे नुकसान सतत होत गेल्यास त्याला शेती व्यवसायात राम वाटणार नाही शेती व्यवसायाकडून तो दुसरीकडे आपोआपच जाईल. यामुळे शेती उत्पादनावर त्याचा परिणाम होणार नाही का...?

शेती उत्पादनाची वाढ व्हावयाची असेल, वाढत्या लोकसंख्येला व औद्योगिक विकासाला शेती उत्पादनाचा पुरवठा होण्यासाठी व देश स्वयंपूर्ण व्हावयाचा असेल तर उत्पादकाला ते करण्यास उत्साह वाटेल असे भाव मिळाले पाहिजेत, त्याने प्रचंड परिश्रम करावेत व त्याने केलेल्या परिश्रमाचा फायदा काहीही कष्ट न करणाऱ्या मध्यस्थाने किंवा धनदांडग्यांनी त्यांनी साठवणूक करुन मिळवावा हे न्यायपूर्ण आहे का? मध्यस्थामार्फत तो फसविल्या जावू नये व भाव पडले तर शेतमालाची साठवणूक करण्याची व्यवस्था असली पाहिजे.

याच हेतूने बाजार नियंत्रणाचे वेगळया राज्यात शेती मालाच्या बाजार नियंत्रणाचे कायदे करण्यात आले आहेत.

**महाराष्ट्र बाजार समित्यांची स्थापना व विकास**

महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजाराच्या इतिहसाची सुरुवात हैद्राबाद संस्थानिकांच्या नियंत्रणात असलेल्या "हैद्राबाद ॲग्रीकल्चरल मार्केट ॲक्ट १९३०" साली फसली येथे स्थापन झाल्यापासुन झाली. परंतु जरी महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजारांची स्थापना ब्रिटिशांच्या कारकिर्दीत १९ व्या शतकात सुरु झाली असली तरी फक्त ती व्यावसायिक दृष्टीने आवश्यक असलेल्या कृषी धान्यांपर्यंत मर्यादित होती. व्यावसायिकतेच्या दृष्टीने ब्रिटिशांनी मॅचेस्टर येथील गिरण्यांना नियमित व रास्त दराने कापसाच्या पुरवठा व्हावा या उद्देशाने इंग्रजांनी पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यामुळे सर्वप्रथम ब्रिटिशांनी हिंगणघाट येथे (पूर्वीचा वर्धा जिल्हयातील तालुका) १८८६ पासून उत्तम दर्जाचा कापूस ब्रिटनमधील कापड गिरण्यांना पाठविला जाऊ लागला. त्यावेळेला फक्त कापूस बाजारच नियमित केला गेला होता. हयानंतर १८९७

साली कापूस व धान्य नियमित करण्यासाठी 'कॉटन ॲन्ड ग्रेन मार्केट' हा कायदा कृषी मालासाठी रॉयल कमिशनच्या सूचनांनुसार नियमित करण्यात आला. या कायद्याचा उद्देश -

१) कृषीमालाच्या किंमतीवर लक्ष ठेवणे.
२) कृषीमालाच्या वजन मापातील होणारे अन्यवहार्य कार्य किंवा शेतकऱ्यांची होणारी फसवणूक यावर नियंत्रण ठेवणे हा होता.

महाराष्ट्रातील त्यावेळेसच्या बॉम्बे स्टेटच्या बॉम्बे रेसिडेंसी गव्हनमेंटने प्रथम 'वेटस ॲन्ड मेझर्स ॲक्ट - १९३२' स्थापन केला. या कायद्यामुळे प्रत्येकवेळी वजन मापे तपासण्याचे काम केले गेले. यासंबधीची जबाबदारी बॉम्बे सरकारच्या इन्स्पेक्टर ऑफ नेट ॲन्ड मेझर या अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली होती. त्यानंतर रॉयल कमिशनने असे सुचविले की, बॉम्बे कायदा हा बेरार कायद्यापेक्षा महत्वाचा व मार्गदर्शक आहे.

१९३५ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाडच्या शेती उत्पन्नाच्या बाजाराबाबत कायदा करण्यात आला. १९३८ मध्ये एक मॉडेल बिल सेन्ट्रल ॲग्रीकल्चरल मार्केटिंग डिपार्टमेंटने तयार केले आणि मुंबई सरकारने १९३९ मध्ये 'द बॉम्बे ॲग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केटिंग ॲक्ट' संमत केला. तसेच १९३९ मध्येच 'मध्यप्रांत व वऱ्हाड कापूस बाजार अधिनियम' मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे १९३९ मध्येच फसलीचा हैद्राबाद शेती उत्पन्नाबाबत अधिनियमन मंजूर करण्यात आला. त्या पाठोपाठ पंजाब, म्हैसूर या राज्यांनी सुद्धा वरील कायदा मंजूर केला.

म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲग्रीकल्चरल प्रोडियूस मार्केट ॲक्ट च्या स्थापनेनंतर रॉयल कमिशनच्या खालील विचारांना मूर्त रुप मिळाले. १९३९ च्या 'द बॉम्बे ॲग्रीकल्चरल मार्केट ॲक्ट' नुसार नियमन करण्यात आले.

१. बाजारभावांचे मार्गदर्शन
२. खरेदीदीर, दलाल, व्यापारी यांच्यातील वाद मिटविणे
३. उघड लिलाव करणे.
४. मार्केटयार्ड स्थापन करुन सरकारच्या पूर्ण नियंत्रणासाठी सदर मार्केट यार्ड देणे.
५. रोजच्या रोज बाजारभावाबद्दल शेतकऱ्यांना त्वरित माहिती देणे.

द बॉम्बे ॲग्रीकल्चरल प्रोडयुस ॲक्ट १९३९ ने नियमित बाजाराचे प्रशासन योग्य पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला गेला. या कायद्याने को ऑपरेटिव्ह सोसायटीज आणि द डायरेक्टर ऑफ ॲग्रीकल्चर मार्केटिंगसाठी रजिस्ट्रार हा अधिकारी नियुक्त केला गेला. हा अधिकारी बाजार समित्या व शासन यांच्यात एकता निर्माण करीत असे. बाजार समितीमध्ये सदस्यांची नियुक्ती करणे, बाजार समितीसाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करणे इ. कामाची जबाबदारी या अधिकाऱ्याची होती. म्हणजे या अधिकाऱ्याला दोन प्रकारची कार्ये पार पाडावी लागत असत. एक म्हणजे बाजार समितीची मुख्य

अधिकारी म्हणून प्रशासकीय काम पाहणे आणि दुसरे म्हणजे शासनाच्या सल्लागार म्हणून.

मुख्य बाजार अधिकारी हा केंद्र किंवा राज्य शासनाकडून प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्त केला जात असे. जिल्हा अधिकारी हा बाजार समितीचे व्यवहार पाहत असे. त्याचप्रमाणे बाजार समितीच्या निवडणूका होत असे, अनुज्ञप्ती देण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे काम देखील करीत असे.

१९३९ च्या कायद्यानुसार महाराष्ट्र व सौराष्ट्रात कोऑपरेटिव्ह सोसायटीचा रजिस्ट्रार आणि ॲग्रीकल्चरल मार्केटचा डायरेक्टर काम पाहत असत संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपर्यंत वरील अधिकारी काम पाहत होते. जिल्हा उपायुक्त हा सेंट्रल प्रोव्हिजन्सच्या ॲक्टनुसार विदर्भातील बाजार समितीचा व्यवहार पाहत होता. मराठवाडयामध्ये बॉम्बे गर्व्हमेंटचा रजिस्ट्रार आणि डायरेक्टर यांना निवडणुका घेण्याचे अधिकार दिले होते. आणि हैद्राबाद ॲग्रीकल्चरल मार्केटच्या नियंत्रणानुसार प्रशासनाचे काम सोपविले. यानंतर हे अधिकार मुख्य बाजार अधिकारी आणि जॉईन्ट रजिस्ट्रार यांना देण्यात आले.

**१. वर्धाजिल्हयातील बाजार समित्यांचा विकास दर्शक सारणी**

| बाजार समित्यांचा विकास | **अवलोकीत संख्या** | **टक्केवारी** | **अपेक्षित संख्या** | **टक्केवारी** | **अंतर** |
|---|---|---|---|---|---|
| होय | ४२ | १४.० | १०० | ३३.३ | −५८ |
| नाही | १९८ | ६६.० | १०० | ३३.३ | ९८ |
| माहित नाही | ६० | २०.० | १०० | ३३.३ | −४० |
| **एकूण** | **३००** | **१००** | **३००** | **१००** | |
| काई वर्ग मुल्य | | स्वतंत्र्यांश | | सार्थकता स्तर | |
| **१४५.६८०** | | **२** | | **<0.05** | |

उपरोक्त सारणीत वर्धा जिल्हयातील बाजार समित्यांचा विकासा विषयक उत्तरदात्याच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ६६ टक्के उत्तरदात्यांच्या मते बाजार समित्यांचा विकासझाला नसल्यांचे निदर्शनास येते. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून देखील बाजार समित्यांचा विकास संदर्भात उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयां दरम्यान महत्वपूर्ण **(Chi Sq. – 145.680; df – 2; P<0.05)** अंतर दिसून आले. सारणीतील परिणामांवरून सार्थकरित्या अधिक वर्धा जिल्हयातील बाजार समित्यांचा विकास झाला नसल्याचे आढळले.

२. वर्धाजिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम दर्शक सारणी

| बाजारपेठेचा अभाव | अवलोकीत संख्या | टक्केवारी | अपेक्षित संख्या | टक्केवारी | अंतर |
|---|---|---|---|---|---|
| पुर्णतः सहमत | ७२ | २४.० | ६० | २०.० | १२ |
| सहमत | १२१ | ४०.३ | ६० | २०.० | ६१ |
| तटस्थ | ४३ | १४.३ | ६० | २०.० | −१७ |
| असहमत | ४९ | १६.३ | ६० | २०.० | −११ |
| पुर्णतः असहमत | १५ | ५.० | ६० | २०.० | −४५ |
| **एकूण** | **३००** | **१००** | **३००** | **१००** | |
| काई वर्ग मुल्य | | स्वतंत्र्यांश | | सार्थकता स्तर | |
| १०५.००० | | ४ | | <०.०५ | |

उपरोक्त सारणीत वर्धा जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम या संदर्भात उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या प्रतिक्रीयांवरून असे दिसून येते की, जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम असण्यासंदर्भात २४ टक्के उत्तरदाते पुर्णतः सहमत असून ४०.३ टक्के उत्तरदाते सहमत आहेत, म्हणजेच एकंदरीत ६४.३ टक्के उत्तरदाते जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम असण्या संदर्भात सहमत आहेत. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून देखील जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे.उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीयां दरम्यान महत्वपूर्ण **(Chi Sq. – 105; df – 4; P<0.05)**अंतर दिसून आले.

## निष्कर्ष

कृषी उत्पन्न बाजार समित्या अभ्यास केला असता असे दिसून येते की, वर्धा जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या विकासाच्या बाबतीत परिपुर्ण आहे. त्या पाठोपाठ चिमूर व कोपरना या बाजार समित्या विकासाच्या विकासाच्या बाबतीत क्रंमाक लागतो. तर गोंडपिपरी व राजूरा या बाजार समित्यांचा विकास पाहिजे तसा झालेला नाही.तसेच एकंदरीत ६४.३ टक्के उत्तरदाते जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम असण्या संदर्भात सहमत आहेत. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून देखील जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे.

## संदर्भग्रंथ


- डॉ. आगलावे, प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती.
- श्री भांडारकर, पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, दत्त प्रकाशन, पुणे, १९७६.

- ❖ प्रा.घाटोळे, रा.ना., सामाजिक संशोधन पद्धती व तत्वे, मंगेश प्रकाशन, १९९०.
- ❖ डॉ. जयप्रकाश मिश्र, ”कृषी अर्थशास्त्र“,
- ❖ ‘महाराष्ट्र राज्यातील पीक उत्पादकेतील प्रादेशिक असंतुलन कृषी अर्थशास्त्राचे मासिक.“
- ❖ राधाकृष्ण पालीवाल, भारताचे आर्थिक प्रश्न आणि नियोजन
- ❖ प्रा. सु. रा. ओझरकर,, सार्वजनिक वित
- ❖ एस आर. वाजपेयी, सामाजिक अनुसंधान तथा सवेक्षण, किताबघर, आचार्य नगर नागपूर
- ❖ प्रा. सु. रा. ओझरकर,, राजस्व
- ❖ डॉ. प्रभाकर देशमुख, आर्थिक नियोजन व विकास, पिंपळापूरे पब्लीकेशन नागपूर
- ❖ पी. जी. सिन्हा, सामाजिक समस्या एवं समाजकल्याण
- ❖ डॉ. शंभुनाथ सिंह, समाजसेवा वन क्षेत्र
- ❖ प्रा. ए. आर. रायखेलकर, सहकार तत्वे आणि व्यवहार
- ❖ श्री संतोष, महाराष्ट्र
- ❖ वर्धा जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक अहवाल